# बृहन्मुंबई महानगरपालिका

## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

## पावसाळी परिस्थितीचा अहवाल

## ८ जूलै २०१८ ते ९ जूलै २०१८ सकाळी ८.०० ते ८.०० (२४ तास)

१. पाऊस:

| स्थळ | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ८ जूलै २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०१८ पावसाची टक्केवारी | ८ जूलै २०१७ मधील पाऊस (२४ तासांतील) (मिमी) | ८ जूलै २०१७ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | २०१७ टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | १७०.६ | ११९०.१ | २२३४ | ५३.२७% | २.४ | ५९४.९ | २७.२४% |
| सांताक्रुझ | १२२ | १३६२.८ | २५१५ | ५४.१९% | १०.२ | ७११.८ | २९.०२% |

२. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस:

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ६ जूलै २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकुण सरासरी पाऊस (२३७५) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | १४४ | १००६ | ४६.०४% | ४८.८३% |
| पूर्व उपनगरे | १०७ | १२६४ | ४८.७४% | |
| पश्चिम उपनगरे | १३१ | ११२८ | | |

३. तापमान:

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | २६ | २३.५ |
| सांताक्रुझ | २६.२ | २२.२ |

४. समुद्राची भरती:

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| ०९.०७.२०१८ | सकाळी ८:५६ | ३.६९ मी. | ०९.०७.२०१८ | दुपारी २:३० | २.१२ मी. |
| ०९.०७.२०१८ | रात्री ८:१९ | ३.६२ मी. | १०.०७.२०१८ | मध्यरात्री २:५५ | ०.९५ मी. |
| १०.०७.२०१८ | सकाळी ९:४९ | ४.०४ मी. | १०.०७.२०१८ | दुपारी ३:३१ | १.९८ मी. |

५. **हवामान अंदाज: कुलाबा वेधशाळेने पुढील २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरात पावसाची संततधार सुरु राहील. काही ठिकाणी जोरदार ते अति जोरदार तर एक किंवा दोन ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे.**

६. **पाणी साचणे** : मुंबई शहर व उपनगरात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे शहरात १) हिंदमाता २) परळ ३) गांधी मार्केट ४) मुख्याध्यापक भवन, सायन ५) सायन रोड नं. २४ ६) हेमंत मांजरेकर मार्ग, सायन ७) सेक्टर नं. ६ अॅन्टॉप हिल पूर्व उपनगरात १) शेल कॉलनी, चेंबुर २) पोस्टल कॉलनी, चेंबुर ३) बैल बाजार, काळे रोड, कुर्ला ४) शितल सिनेमा, एल बी एस मार्ग व पश्चिम उपनगरात १) सिद्धार्थ नगर, गोरेगांव २) नॅशनल कॉलेज, बांद्रा ३) मिलन सबवे ४) कपाडीया नगर, बीकेसी अशा काही ठिकाणी पाणी साचल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर सर्व तक्रारी त्वरीत संबंधित विभाग नियंत्रण कक्षांना कळविण्यात आल्या असुन उदंचन संच व कामगारांच्या सहाय्याने पर्जन्यजलवाहिकाच्या मार्गीका साफ करुन पाण्याचा निचरा करण्यात येत आहे.

७. **घर पडल्याच्या तक्रारी**: शहरात ५, पूर्व उपनगरात ४ व पश्चिम उपनगरात २ अशा एकूण ११ ठिकाणी घराचा भाग / भिंत कोसळण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विभागांना कळविण्यात आल्या आहेत. या घटनांमध्ये कुणालाही मार नाही.

८. **दरड कोसळणे**: निरंक

९. **शॉर्टसर्किट**: शहरात २०, पूर्व उपनगरात ९ व पश्चिम उपनगरात ३ अशा एकूण ३२ ठिकाणी शॉर्टसर्किट होण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विद्युत पुरवठा यंत्रणांना कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

१०. **झाडे पडण्याच्या तक्रारी**: शहरात ८, पूर्व उपनगरात २ व पश्चिम उपनगरात १३ अशा एकूण २३ ठिकाणी झाडे/फांद्या पडण्याच्या तक्रारी नागरीकांकडुन प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विभागांना पडताळणीसाठी व पुढिल कार्यवाहीकरीता कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

११. **वाहतुक व्यवस्था : (आज सकाळी ९:०० वा. प्राप्त माहितीनुसार)**

- **पश्चिम रेल्वे** : नालासोपारा येथे रेल्वे रुळावर पाणी आल्याने, वाहतुक साधारणपणे१५ ते २० मिनीटे उशिराने होत आहे.
- **मध्य रेल्वे** : वाहतुक साधारणपणे१५ ते २० मिनीटे उशिराने होत आहे.
- **हार्बर रेल्वे** : वाहतुक साधारणपणे१५ ते २० मिनीटे उशिराने होत आहे.
- **बीईएसटी** : १) श्रीरंग साबळे मार्ग, गोरेगांव (प) २)बैल बाजार, काले रोड, साकीनाका ३) गांधी मार्केट ४) सायन रोड नं. २४ ५) बांद्रा टॉकीज एस व्ही रोड ६) एन एल कॉंप्लेक्स, दहिसर येथील वाहतुक पर्यायी मार्गावरुन वळविण्यात आली आहे.

१२. **विशेष माहिती : निरंक**